**महाराष्ट्र शासन**

क्र.व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/प्राशि-३/शिकाना
शालेय शिक्षण विभाग,
शिबीर कार्यालय,
हैद्राबाद हाऊस,नागपूर.
दिनांक:- १० डिसेंबर, २००१.

प्रति
विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक/अमरावती/पुणे/नागपूर.

विषय :- सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या
**खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत**

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे (व) स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ५ शैक्षणिक.संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही. या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून,२००० पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधीत संस्थांना तात्काळ कळविण्यात यावा.

२. सदर परवानगी शासन पत्र क्र.व्हीएलएस १०००/(५०२/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच शासन पत्र दिनांक २१ जुलै,२००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्तीच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळांस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळांना शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्याठिकाणी शाळांना परवानगी द्यावयाची आहे, त्याठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे. याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

(स्वाक्षरी)
( वि.च.चिंदरकर )
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
(१) शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
(२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद
(३) मा.सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
(४) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
(५) मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
(६) निवड नस्ती (प्राशि-३)

(सन २०००-२००१ या वर्षी (जून २००० पासून ) इंग्रजी माध्यमाच्या ५ नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्रमांक व्हीएलएस-२०००/(५०९/२०००)प्राशि-३ शिकाना, दिनांक १० डिसेंबर २००१ चे सहपत्र)

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण |
|---|---|---|
| | जिल्हा :- पुणे | |
| १ | प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे | वारजे, जिल्हा पुणे. |
| | जिल्हा :- धुळे | |
| २ | दोंडाईचा एज्युकेशन सोसायटी, दोंडाईचा, जिल्हा धुळे | दोंडाईचा, जिल्हा धुळे. |
| | जिल्हा :- गोंदिया | |
| ३ | सेंट लॉरेन्स एज्युकेशन सोसायटी, बोरीवली, मुंबई | रेलटोली, जिल्हा गोंदिया |
| | जिल्हा :- यवतमाळ | |
| ४ | छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था, वणी, जिल्हा यवतमाळ | मारेगांव, जिल्हा यवतमाळ |
| ५ | छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था, वणी, जिल्हा यवतमाळ | वणी, जिल्हा यवतमाळ |